पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• वर्ष १ ले • अंक : १२ • ऑक्टोबर, २००८ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## शुभेच्छा

### महापालिका अधिकारी/सेवकांना ही दिपावली उत्साह, कार्यप्रेरणावर्धक, आरोग्यदायी, सुखसंपन्न व भरभराटीची जावो.

## आरोग्य,स्वच्छता, योग, प्राणायम जनजागरण अभियान

पुणे महापालिका आणि पतंजली योग समिती, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक १८/१०/२००८ रोजी दु. २.०० ते ४.३० या कालावधीत पं.नेहरु स्टेडियम येथे योगमहर्षी परमपूज्य मा. रामदेवजी बाबा यांचे आरोग्य, स्वच्छता, योग व प्राणायम जनजागरण आयोजित करण्यात आले होते. या जनजागरण शिबीरास मा. हर्षवर्धन पाटील, पणन व रोजगार हमी योजना मंत्री, मा. सौ.राजलक्ष्मी भोसले, महापौर, पुणे, मा. अनिल भोसले, सभागृह नेता, मा. शाम देशपांडे, अध्यक्ष, स्थायी समिती, मा. विकास मठकरी, विरोधी पक्ष नेता, मा. प्रवीणसिंह परदेशी, महापालिका आयुक्त, मा. एम.एस.देवणीकर, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज), मा. उमाकांत दांगट, अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि), इतर पदाधिकारी, मा. सभासद, मा. खातेप्रमुख, महापालिका/शिक्षण मंडळ/पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. चे कर्मचारी, पतंजली योग समितीचे योग शिक्षक व पुणेकर नागरिक हे उपस्थित होते. या जनजागरण शिबीराचा लाभ सुमारे २० ते २५ हजार सेवक व नागरिकांनी घेतला.



जनजागरण अभियानाच्या सुरुवातीस मा. रामदेवजी बाबा यांचे आगमन होताच त्यांना महापालिकेमधील पाच सफाई सेविकांनी औक्षण केले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर मा. रामदेवजी बाबा यांना मा. हर्षवर्धन पाटील, पणन व रोजगार हमी मंत्री यांचे हस्ते शॉल, स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देवून गौरविण्यात आले. त्यानंतर मा. महापालिका आयुक्त यांनी उपस्थित सर्व मान्यतवरांचे शॉल व पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. प्रवीणसिंह परदेशी, महापालिका आयुक्त यांनी केले. प्रास्ताविकामध्ये राष्ट्रकुल युवा स्पर्धेच्या निमित्ताने सर्व महापालिका अधिकारी आणि कर्मचारी (विशेषत: अभियंता व सफाई कर्मचारी) यांनी केलेल्या विशेष कामगिरीची दखल घेतली. तसेच, पुणे शहरामध्ये झालेली विकास कामे आणि सौंदर्य व स्वच्छता यांचे खरे श्रेय महापालिकेच्या कर्मचारी वर्गाला जाते. शहराचे आरोग्य राखणाऱ्या कर्मचाऱ्याचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ ठेवून त्यांचेमध्ये कार्यक्षमता वाढीस लावणेसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे मा. आयुक्त यांनी सांगितले.

प्रमुख पाहुण्यांच्या मनोगतामध्ये मा. हर्षवर्धन पाटील यांनी मा. रामदेवजी बाबा यांचे योग, प्राणायम जनजागरण शिबीरामध्ये मार्गदर्शन उपस्थितांना निश्चितच प्रेरणादायी आणि उपयुक्त ठरेल, याबाबत शंका नसल्याचे स्पष्ट केले. याशिवाय अशा प्रकारचा उपक्रम हाती घेतल्याबद्दल मा. महापालिका आयुक्त यांचे त्यांनी अभिनंदन केले. मा. राजलक्ष्मी भोसले, महापौर, पुणे यांनी आपल्या मनोगतामध्ये महापालिका आयुक्त आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. तसेच, महापालिका अधिकारी/कर्मचारी आणि मा. सभासद यांचेकरिता सात दिवसांचे शिबीर आयोजित करणेकामी बहुमुल्य वेळ देण्याचे आवाहन मा. रामदेवजी बाबा यांना केले. या उपक्रमाचे निमित्त साधून मा. शामदेशपांडे, अध्यक्ष स्थायी समिती यांनी पतंजली योग समिती, हरिद्वार यांना रक्कम रु. १०.०० लाखाचा धनादेश महापालिकेतर्फे देण्याची घोषणा केली. त्यानंतर ज्ञानप्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी अतिशय सुबक व सहजसुंदर योगासनांची प्रात्यक्षिके सादर केली.

पुणे शहरात झालेली विकास कामे आणि शहरामधील स्वच्छता व सौंदर्य आणि अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी हाती घेतलेला स्तुत्य उपक्रमाबद्दल मा. रामदेवजी बाबा यांनी मा. प्रवीणसिंह परदेशी, महापालिका आयुक्त यांचे विशेष कौतुक करुन त्यांचा समायोचित सन्मान केला. मा. रामदेवजी बाबा यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये शहराची स्वच्छता राखणाऱ्या कर्मचाऱ्यांची स्वच्छता कशी राखावी आणि ते किती महत्वाचे आहे, या अनुषंगाने प्रबोधन केले. तसेच, प्राणायमाचे विविध प्रकार, योगासने, व्यसनांचे दुष्परिणाम आणि निरोगी जीवनाची गुरुकिल्ली या बाबींच्या अनुषंगाने मा. रामदेवजी बाबा यांनी प्रात्यक्षिक करुन दाखविले. तसेच, आज दिसणारे स्वच्छ व सुंदर पुणे शहर पुढील कालावधीमध्ये असेच राहील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. याशिवाय महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येणारे योगासन व प्राणायमाचे वर्ग आणि विद्यार्थ्यांचा उत्साह यांचे त्यांनी विशेष कौतुक केले. त्याचप्रमाणे सफाईचे काम करताना उभा झाडू वापरावा, दिलेले काम नियमित व मुदतीत पूर्ण करावे, व्यसनांपासून दूर रहावे, योग आणि प्राणायमद्वारे शरीर आणि मन सुदृढ ठेवावे, इत्यादी प्रबोधनपर मार्गदर्शन मा. रामदेवजी बाबा यांनी उपस्थितांना केले.

या कार्यक्रमामध्ये शहराच्या स्वच्छता अभियानात विशेष कामगिरी बजावलेल्या २० सफाई कर्मचारी, १० मोकादम, कार्यक्रम आयोजन समन्वय समितीच्या सभासदांचा स्मृतीचिन्ह देवून मा. रामदेवजी बाबा यांच्या हस्ते सत्कार केला. कार्यक्रमाच्या शेवटी पुणे मनपा शिक्षण मंडळाच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत सौ. बनकर यांच्या नेतृत्वाखाली सादर केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पुणे मनपा आणि पतंजली योग समितींच्या सर्व सेवक/अधिकारी/पदाधिकारी यांनी संयुक्तपणे विशेष परिश्रम घेतले. त्यामुळे सदर कार्यक्रम अत्यंत दिमाखदार व यशस्वीपणे पार पडला.

## माहिती अधिकार अधिनियम कार्यशाळा

मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ येथे विशेष अपिल निर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात महापालिकेविरुध्द दाखल झालेल्या १४५ अपिलांची सुनावणी घेण्यात आली. या सुनावणी दरम्यान मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग यांनी केलेली सूचना आणि मा. महापालिका आयुक्त, पुणे यांनी दिलेल्या आदेशानुसार महापालिकेतील सर्व अपिल व जन माहिती अधिकारी यांचेसाठी यशदा येथे दिनांक २०/९/२००८ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेस १०२ अपिल, जन माहिती व सहाय्यक जन माहिती अधिकारी उपस्थित होते. याशिवाय स्वयंसेवी संस्थांचे निमंत्रित प्रतिनिधीही उपस्थित होते. या त्रिस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यापूर्वी मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) तथा समन्वयक यांनी ४-५ वेळा यशदा येथे जावून श्री. प्रमोद माने, सल्लागार व श्री. नवीन यादव, माहिती अधिकार कक्ष यांचेशी समक्ष चर्चा करुन या कार्यशाळेमध्ये दैनंदिन कामकाज करताना येणाऱ्या अडचणी, त्यावरील उपाय ही गरज विचारात घेवून वेगळ्या प्रकारे कार्यशाळेचा अभ्यासक्रम विहित केला होता.



सकाळी ठिक ९.३० वाजता कार्यशाळेस मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) तथा समन्वयक यांनी कार्यशाळेचा हेतू प्रास्ताविकाद्वारे स्पष्ट करुन सुरुवात केली. यामध्ये दैनंदिन कामात येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे, कोणती माहिती, कशा प्रकारे, कोणत्या नमुन्यात द्यावी याबाबत कार्यशाळेमधील मार्गदर्शन सर्वांना निश्चित उपयुक्त ठरेल अशी आशा व्यक्त केली. तदनंतर मा. प्रमोद माने, सल्लागार, माहिती अधिकार कक्ष, यशदा यांनी अधिनियम अंमलबजावणीकामी येणाऱ्या अडचणी, स्वयंसेवी संघटनांची निवेदने आणि कलम ४ नुसार जाहीर करावयाची बंधनकारक माहिती या बाबींचा विचार करुन वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम तयार केला असल्याचे नमूद केले. या कार्यशाळेतील प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थींनी आपला दृष्टिकोन सकारात्मक करावा असे आवाहन त्यांनी केले. या कार्यशाळेमध्ये खालील तज्ञ व्याख्यात्यांनी मार्गदर्शन केले.

अधिनियमातील महत्वाच्या संकल्पना : ॲड. एम.डी.महाशब्दे यांनी माहिती, माहिती अधिकार, सार्वजनिक प्राधिकरण आणि तृतीय पक्षाची माहिती या महत्वाच्या संकल्पना स्पष्ट करुन सांगितल्या. त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी माहिती देणे आहे. अधिनियमान्वये माहितीशी संबंधित निर्देश दिलेल्या सर्व सेवकांची समान जबाबदारी आहे. श्री. महाशब्दे यांनी माहितीची व्याख्या, व्याप्ती आणि माहितीचे स्वरुप उदाहरणासह स्पष्ट केले. तसेच, माहिती अधिकार अधिनियमामध्ये माहिती नव्याने तयार करावयाची नसून, आहे ती माहिती उपलब्ध स्वरुपात देणे आहे. छायांकित प्रती, सत्यप्रती, प्रमाणित प्रती, इत्यादींबाबत श्री. महाशब्दे यांनी सविस्तर विवेचन केले. सार्वजनिक प्राधिकरणाबाबत माहिती देताना प्राधिकरण म्हणजे काय, त्यामध्ये कोणत्या संस्थांचा समावेश होतो, याचे सविस्तर विवेचन केले.

अभिलेख व्यवस्थापन : श्री. मनोज कुलकर्णी यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी सार्वजनिक

पान क्र. ४ पहा

संपादकीय...

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

काही अल्प लोकांच्या हाती सत्ता देवून खरे स्वराज्य साकार होणार नाही तर सत्तेच्या दुरुपयोगाला विरोध करण्याचे सामर्थ्य सर्व जनतेमध्ये येईल तेंव्हाच खरे स्वराज्य निर्माण होईल या राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारामधून खरे लोककल्याणकारी राज्याची संकल्पना प्रतिबिंबीत होते. जनतेचे हित सर्वश्रेष्ठ असल्याने नागरिकांना माहिती देणे अनिवार्य आहे, हा विचार करुन संयुक्त राष्ट्रसंघाने १९४६ साली मुलभूत माहिती अधिकाराचा ठराव संमत केला.

त्यानंतर ही संकल्पना जगभर रुजविण्यासाठी जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमार्फत जगभर प्रसार केला. याचाच एक भाग म्हणून १९९७ साली मुख्यमंत्र्यांच्या परिषदेमध्ये भारतात या दृष्टीने प्रयत्न सुरु झाले. याचा अंतिमत: परिणाम म्हणून भारतात तामिळनाडू, राजस्थान, महाराष्ट्र, दिल्ली, इत्यादी राज्यांनी माहिती अधिकार अधिनियम संमत करुन त्याची अंमलबजावणी सुरु केली.

भारतीय जनतेला अत्यंत प्रभावीपणे माहिती मिळण्याच्या दृष्टीने हा अधिनियम अधिक पुरोगामी, सर्व समावेशक व अर्थपूर्ण असला पाहिजे, असे सरकारने योजले होते. सुरळीतपणे व अत्यंत प्रभावीपणे माहिती मिळविण्यासाठी राष्ट्रीय सल्लागार परिषदेने व इतरांनी सुचविलेल्या शिफारशींचे परीक्षण केल्यानंतर भारत सरकारने या कायद्यात अनेक बदल करण्याचे ठरविले. यानुसार प्रस्तावित बदल विचारात घेवून माहितीचे स्वातंत्र्य अधिनियम, २००२ निरसित करण्याचे व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९ अन्वये मान्य केलेला माहितीचा अधिकार अंमलात आणण्यासाठी एक परिणामकारक चौकट तयार करण्यासाठी कायदा अधिनियमित करण्याचे ठरविले.

माहिती अधिकार अधिनियम, २००५ लागू करण्यापूर्वी भारतामध्ये ब्रिटीशकालीन गुप्ततेचा अधिनियम, १९२३ अंमलात होता. या अधिनियमामधील तरतुदी विचारात घेता गोपनियतेच्या नावाखाली कुठल्या प्रकारची माहिती जाहीर करणे किंवा उपलब्ध करुन देण्यात येत नव्हती. भारतातील विविध घटक राज्यांनी केलेले स्वतंत्र माहिती अधिकार अधिनियम आणि गुप्ततेचा कायदा यामधील तरतुदी परस्पर विसंगत होत्या. याशिवाय भारतातील सर्व राज्यांना माहिती अधिकार अधिनियमाच्या कार्यक्षेत्रामध्ये आणणेसाठी एका स्वतंत्र कायद्याची आवश्यकता होती. विविध घटक राज्यात अस्तित्वात असलेले कायदे, त्यांच्या विभिन्न तरतुदी यामध्ये सुसंगती व एकसूत्रता आणून सर्व भारतासाठी एकच सर्वसमावेशक अधिनियम आणणेकामी व कारभारात पारदर्शकता येवून जनतेला माहिती मिळणेसाठी भारताने माहिती अधिकार अधिनियम अंमलात आणला. मा. राष्ट्रपतीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर दिनांक १२ ऑक्टोबर, २००५ पासून हा कायदा जम्मू-काश्मिर वगळून सर्व भारतात अंमलात आला. यामुळे अस्तित्वातील शासकीय गुप्तता अधिनियम, १९२३ चे महत्व एकदम कमी झाले. शासन यंत्रणा अधिकाधिक पारदर्शक, प्रतिसादक्षम व कार्यक्षम बनून भ्रष्टाचार व लाल फितीचा कारभार कमी होण्याची अपेक्षा आहे. या कायद्यामुळे शासकीय माहिती जनतेला खुली झाली असून एका नव्या लोकशाहीचा उदय झाला, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

या केंद्रीय कायद्यामुळे विविध राज्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या स्वतंत्र माहिती अधिकार अधिनियम संपुष्टात आले. या अधिनिमामध्ये एकूण ११ प्रकरणे असून, ३१ कलमांचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. भारतामध्ये जे विविध अधिनियम अस्तित्वात आहेत त्या अधिनियमांमधील तरतुदींची अंमलबजावणी सर्वसामान्य जनतेकडून करण्यात येते आणि त्यांचे नियंत्रण सरकारी यंत्रणा करत असते. परंतु माहिती अधिकार अधिनियम असा एकमेव अधिनियम आहे की ज्याची अंमलबजावणी सरकारी यंत्रणेने करणे बंधनकारक आहे आणि त्याचे नियंत्रण सर्वसामान्य जनतेच्या हातामध्ये देण्यात आलेले आहे. या अधिनियमाचा प्रमुख उद्देश शासकीय कामकाजात पारदर्शकता आणणे, शासन लोकाभिमुख बनविणे, सर्वसामान्य जनतेच्या हितावर परिणाम करणाऱ्या धोरण आणि निर्णयांची माहिती जनतेस देणे आणि भ्रष्टाचार कमी करणे, इत्यादी आहेत. माहिती अधिकार अधिनियम हा अधिकार सर्वसामान्य जनतेला देण्यात आलेला आहे. त्यामध्ये लहानमोठे, गरीबश्रीमंत, सुशिक्षित अशिक्षित, अंधअपंग, इत्यादीबाबत कोणत्याही प्रकारचा भेदभाव करण्यात आलेला नाही. जन्माला आलेले मुल किंवा वयोवृध्द नागरिक या कायद्याचा वापर करु शकतील.

कोणत्याही शासकीय संस्थेचा कारभार नागरिकांकडून कररुपाने संकलित होणाऱ्या निधीवर अवलंबून असतो. त्यामुळे भारतीय राज्य घटनेमध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक नागरिकाला माहिती मिळविण्याचा मुलभूत हक्क आहे. या बाबी विचारात घेवून लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या नागरिकांसाठी केलेला हा अधिनियम निश्चितपणे मैलाचा दगड म्हणून इतिहासामध्ये ओळखला जाईल. तथापि, नागरिकांनी या अधिनियमाचा वापर करताना सार्वजनिक हिताचे भान ठेवून वैयक्तिक लाभासाठी याचा वापर करणेकामी काही काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच, शासन दरबारी काम करणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांनी या अधिनियमातील तरतुदींची परिणामकारक अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

## लाख मोलाचे सहकार्य

केंद्रीय कामगार शिक्षण मंडळाचे सहकार्याने महापालिका सेवकांसाठी दरवर्षी ३-४ कामगार प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येते. सदर कामगार प्रशिक्षण योजना सन १९७६ पासून कार्यरत आहे. सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये वर्ग क्र. ७१ व ७२ साठी एकूण ८० सेवकांची निवड करण्यात आली होती. दि.१ जुलै ते १४ ऑगस्ट ०८ या ४५ दिवसांच्या कालावधीमध्ये कसबापेठ येथे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणादरम्यान दोन औद्योगिक आस्थापनांच्या भेटीही आयोजित केल्या होत्या. प्रशिक्षण वर्गातून गैरहजेरी व वैयक्तिक कारणास्तव ३२ प्रशिक्षणार्थींची नावे कमी झाली. अंतिमत: ४८ प्रशिक्षणार्थी वर्गामध्ये होते. प्रशिक्षण वर्ग यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर दिनांक १८ ते ३० सप्टेंबर, २००८ या कालावधीत जालंदर-अमृतसर-चंदिगड-सिमला-कुलू मनाली-दिल्ली-पुणे याप्रमाणे शैक्षणिक प्रशिक्षण दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ४८ प्रशिक्षणार्थी, २ कामगार शिक्षक व १ पर्यवेक्षक असे ५१ अधिकारी/कर्मचारी सहभागी झाले होते.

शैक्षणिक प्रशिक्षण दौरा या ५१ प्रशिक्षणार्थींसह दि.१८/९/०८ रोजी पुण्याहून रेल्वेने रवाना झाला. यादरम्यान प्रशिक्षणार्थींनी चंदिगड व अमृतसर महापालिकेस भेटी देवून कामकाजाची माहिती करुन घेतली. शैक्षणिक प्रशिक्षण दौऱ्याच्या पुढील टप्यामध्ये सिमला व दिल्ली महापालिकेस भेट देण्याचे प्रस्तावित होते. तथापि, सिमला मनपाची भेट ऐन वेळी अपरिहार्य कारणास्तव रद्द झाली. परतीच्या प्रवासासाठी घेतलेल्या स्थानिक बसला कुलूपासून १५ किमी अंतरावर दि.२६/९/०८ रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास भीषण अपघात झाला. या अपघाताचे वृत्त सकाळी ११.४५ वाजता दूरध्वनीवरुन मनपामध्ये समजल्यानंतर या अपघातग्रस्ताना तातडीने मदत देणेकामी मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) यांचे कार्यालयात मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज), मा. खातेप्रमुख व पुणे मनपा कामगार संघटनेचे पदाधिकारी यांची बैठक झाली. या बैठकीमध्ये मा. सुधा देवी, जिल्हाधिकारी, शिमला यांचेशी दूरध्वनीवरुन चर्चा करुन त्यांना अपघातग्रस्तांना योग्य ती मदत सत्वर देणेकामी आणि अपघाताचे ठिकाण व रुग्णालयात भेट देणेकामी विनंती करण्यात आली. त्यानुसार मा. सुधा देवी, जिल्हाधिकारी यांनी संबंधित रुग्णालयास भेट देवून रुग्णांना सत्वर वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन दिल्या. तसेच, मा. पदाधिकारी यांनी मा. राज्यपाल, हिमाचल प्रदेश यांचेशी संपर्क साधून अपघातग्रस्तांना सुविधा उपलब्ध करुन यांना विनंती केली.

या बैठकीमध्ये या अपघातग्रस्तांना सत्वर मदत देणेकामी एकूण ६ अधिकारी/सेवकांचे पथक कुलू येथे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने खालील अधिकारी व सेवकांना दिनांक २६/९/२००८ रोजी सायंकाळी ४ च्या विमानाने कुलूकडे रवाना झाले.

१. श्री. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार)
२. श्री. शिवाजी दौंडकर, कामगार कल्याणाधिकारी
३. डॉ. पंडित सोनकांबळे, वैद्यकीय अधिकारी
४. श्री. विठ्ठल जगदाळे, स्टार्टर
५. श्री. अशोक धुमाळ, मोटार सारथी
६. श्री. गणेश मांजरे, रखवालदार

अपघातातील मृत कर्मचाऱ्यांचे मृतदेह पुणे येथे विमानाने आणणेकामी आवश्यक बाबींची पूर्तता करणेकामी दि. २६/९/२००८ रोजी सदरचे ४ मृतदेह चंदिगड किंवा दिल्ली येथे त्याच रात्री पाठविणे आवश्यक होते. ही बाब विचारात घेवून मा. सुधा देवी, जिल्हाधिकारी यांचेशी चर्चा करुन ४ मृतदेह रात्री १२.३० च्या सुमारास पोलिसांसमवेत कुलू येथून चंदिगड येथे हलविण्याचा निर्णय घेतला. उपरोक्त सहा जणांच्या पथकातील डॉ. सोनकांबळे, सर्वश्री जगदाळे व धुमाळ यांना रात्री दिल्ली येथून रात्री २.३० वाजता चंदिगड येथे पाठविले. तत्पूर्वी अत्यवस्थ असलेल्या श्री. देवकर व श्री. चरवड यांना तातडीने चंदिगडच्या पीजीआय रुग्णालयात हलविण्यात आले होते.

तदनंतर मा. श्री. शाम देशपांडे, अध्यक्ष स्थायी समिती, मा. अनिल भोसले, सभागृह नेता, मा. विकास मठकरी, विरोधी पक्ष नेता व मा. अविनाश साळवे, सदस्य, स्थायी समिती याचेसह दिनांक २७/९/२००८ रोजी सकाळी ७.३० वाजता कुलू येथे पोहोचलो. तेथून कुलूच्या रिजनल हॉस्पिटल मध्ये पोहचल्यानंतर सर्वांनी ४२ जखमी कर्मचाऱ्यांची विचारपूस करुन त्यांना योग्य त्या वैद्यकीय सुविधा तात्काळ उपलब्ध करुन देणेकामी मदत केली. तसेच, मृत सेवकांचे शवविच्छेदन अहवाल, पोलिसांचे ना हरकत पत्र व प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) उपलब्ध करुन घेवून तात्काळ चंदिगड येथे फॅक्स केले.

चंदिगड येथील पथकाने पीजीआय हॉस्पिटलमध्ये मृतदेहांवर योग्य त्या प्रक्रिया करुन व शवपेट्या उपलब्ध करुन घेवून सर्व मृतदेह चंदिगड वरुन मुंबईला पाठविले. त्यानंतर ४ मृतदेह प्रथम मनपा भवनात आणून त्यांना श्रध्दांजली वाहिल्यानंतर नातेवाईकांच्या ताब्यात सदर मृतदेह त्यांचे निवासस्थानी देण्यात आले.

अपघातग्रस्त सर्व रुग्णाईतांना तातडीने सर्व सुविधा उपलब्ध असणाऱ्या रुग्णालयात हलवून वेळीच उपचार करणे आवश्यक असल्याने व जवळपास सर्व सोयीयुक्त हॉस्पिटल नसल्याने एकंदर परिस्थितीचे गांभीर्य व संबंधित रुग्णालयाच्या मर्यादा यांचा एकत्रित विचार करुन मा. पदाधिकाऱ्यांनी वरिष्ठ पातळीवर चर्चा करुन, रुग्णाईतांना विशेष विमानाने पुणे येथे हलविण्याचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने दिनांक २८/९/२००८ रोजी ३१ अधिकारी/सेवकांना (२८ जखमी कर्मचारी व ३ इतर) विशेष विमानाने कुलूवरुन पुणे येथे आणण्यात आले. पुण्यामध्ये आल्यानंतर सर्व जखमींना रुबी हॉल क्लिनिक, सह्याद्री हॉस्पिटल, पुना हॉस्पिटल, शारदा हॉस्पिटल, इत्यादी ठिकाणी पुढील उपचारार्थ दाखल करण्यात आले. पुण्यापासून १५०० कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर झालेल्या अपघातामधील अपघातग्रस्तांना बाहेर काढणे, त्यांना रुग्णालयापर्यंत पोचविणे, तात्काळ औषधोपचार करणे, चार मृतदेह पुणे येथे हलविणे व जखमींना विशेष विमानाना पुणे येथे आणणे हे काम अत्यंत जिकिरीचे होते. या गंभीर प्रसंगामध्ये मा. शरद पवार, कृषी मंत्री, भारत सरकार, मा. प्रभा राव, राज्यपाल, हिमाचल प्रदेश, मा. प्रफुल पटेल, नागरी हवाई उड्डाण मंत्री, भारत सरकार, मा. महापौर, पुणे, मा. अध्यक्ष, स्थायी समिती, पुणे, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता, मा. अविनाश साळवे, मा. डॉ. सिध्दार्थ धेंडे, मा. महापालिका आयुक्त, मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त, मा. जिल्हाधिकारी, सिमला, कुलू रिजनल हॉस्पिटलचे अधिक्षक मा. ओमपाल शर्मा, जिल्हा पोलिस अधिक्षक मा. जगतराम, महापालिकेचे सर्व पदाधिकारी, मा. सभासद, मा. खातेप्रमुख, असंख्य कर्मचारी आणि कामगार संघटना यांच्या सहस्त्र हातांनी केलेल्या लाखमोलाच्या मदतीमुळे अनेक जखमींचे प्राण वाचले. याबद्दल महापालिका प्रशासन सर्वांचे शतश: ऋणी आहे. यामध्ये श्री. अशोक धुमाळ व श्री. विठ्ठल जगदाळे यांनी घेतलेल्या विशेष परिश्रमाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांचेही शतश: आभार.

## सेवापूर्ती समारंभ

माहे ऑगस्ट, २००८ मध्ये सेवानिवृत्त सेवकांचा सेवापूर्ती समारंभ कॅ.वडके सभागृह येथे दिनांक ३१/८/२००८ रोजी संपन्न झाला. माहे ऑगस्ट, २००८ मध्ये विविध संवर्गातील १० वयपरत्वे व ४ ऐच्छिक असे एकूण १४ सेवक सेवानिवृत्त झाले. समारंभास मा. अविनाश साळवे, सभासद, पुणे मनपा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



सुरुवातीस मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांनी सेवानिवृत्त समारंभ आयोजनामागील भूमिका विषद केली व सेवानिवृत्त सेवकांना त्यांच्या उर्वरित आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सेवानिवृत्ती झाली म्हणजे पुणे मनपाशी आपला संबंध संपला असे नाही. पुणे महानगरपालिका प्रशासनाने विविध विकास कामांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविणेकामी विशेष प्रयत्न सुरु केले आहेत. त्याचाच भाग म्हणून सेवानिवृत्त सेवकांनी वेळोवेळी प्रशासनास मार्गदर्शन करावे, असे मा. जगताप यांनी या वेळी आवर्जुन सांगितले. तसेच, सेवानिवृत्तीच्या वेळी मिळालेल्या अनुज्ञेय रकमा योग्य ठिकाणी सुरक्षिततरित्या गुंतवाव्यात, जेणेकरुन वृध्दापकाळात सदर रकमांच उपयोग सेवानिवृत्तांना होवू शकेल, असेही श्री. जगताप यांनी सांगितले.

प्रमुख पाहुणे मा. अविनाश साळवे, सभासद यांनी सल्लागार (कामगार) कार्यालयामार्फत सुरु करण्यात आलेला हा उपक्रम स्तुत्य आहे. वर्ग १ ते ४ मधून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व सेवकांना एकाच व्यासपीठावर सन्मानित करणे ही बाब अतिशय वाखाणण्याजोगी असून, सेवकांनी आयुष्यभर केलेल्या सेवेची दखल या रुपाने प्रशासन घेत असल्याचे त्यांनी नमूद केले. सेवानिवृत्त सेवकांनी सेवानिवृत्तीनंतर विविध कार्यांमध्ये मग्न रहावे, एकाकी जीवन जगू नये, सामाजिक व शैक्षणिक कार्यामधून सक्रीय सहभाग घ्यावा, उधार पैसे देवू नयेत, असुरक्षित ठिकाणी गुंतवणूक करु नये, इत्यादी बाबींचे पालन सेवानिवृत्तांनी करावे, असे आवाहन मा. साळवे यांनी केले. तसेच, सर्व सेवानिवृत्तांना त्यांचे उर्वरित आयुष्य सुखसमृध्दी आणि आरोग्यदायी जावो, अशा शुभेच्छा या प्रसंगी त्यांनी दिल्या. यानंतर सर्व निवृत्तांना स्मृतीचिन्ह व शॉल देवून सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. जयवंत शिंदे, ज्युनिअर ग्रेड लेखनिक यांनी केले.

## चुकवू नये असे काही

१. माहे सप्टेंबर आणि ऑक्टोबर, २००८ या महिन्यांमध्ये सेवानिवृत्त झालेल्या सेवकांचा सेवापूर्ती समारंभ काही अपरिहार्य कारणास्तव होवू शकला नाही. सदर सेवापूर्ती समारंभ शुक्रवार, दिनांक १४/११/२००८ रोजी दुपारी ४.०० वाजता कॅ. वडके सभागृह येथे आयोजित करण्यात आलेला आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घेवून सेवानिवृत्त सेवक यांना त्याप्रमाणे सत्वर कळवून पुढील कार्यवाही करावी.

२. पुणे महापालिका अधिकारी/सेवकांसाठी नॅशनल एज्युकेशन या संस्थेमार्फत औषधविरहित जीवन या विषयावर शनिवार दिनांक १५/११/२००८ रोजी सकाळी ११.०० वाजता कॅ. वडके सभागृह येथे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या मार्गदर्शनामध्ये दैनंदिन कामकाज करताना आणि जीवन जगताना येणारे ताणतणाव कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तरी, या मार्गदर्शनाचा सर्व महापालिका अधिकारी/सेवकांनी अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन कामगार कल्याण निधीमार्फत करण्यात येत आहे.

## महापालिका सेवकवर्ग गणेशोत्सव समितीमार्फत विधायक उपक्रम

पुणे महापालिका सेवकवर्ग गणेशोत्सव समितीमार्फत दिनांक ३ ते १४ सप्टेंबर या कालावधीत टिळक पुतळा, मंडई येथे गणेशोत्सव साजरा करण्यात आला. या गणेशोत्सवाच्या कालावधीमध्ये गणेशोत्सव समितीमार्फत अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक ३/९/२००८ रोजी मा. एम.एस.देवणीकर, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांच्या हस्ते श्रींची प्रतिष्ठापना करण्यात आली. त्याच दिवशी मा. श्री. प्रवीणसिंह परदेशी, महापालिका आयुक्त यांनी समक्ष भेट देवून खड्डेविरहित मंडपाची पहाणी करुन श्रींचे दर्शन घेतले. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये दिनांक १०/९/२००८ रोजी महापालिकेमध्ये रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये एकूण ६५ मनपा सेवकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले.





गणेशोत्सवाच्या कालावधीमध्ये मा. अंबरीश गालिंदे, सह आयुक्त (मुलेप), मा. भानुदास माने, उप आयुक्त (ज) यांच्या हस्ते श्रींची आरती व पूजा करण्यात आली. तसेच, अनेक मा. पदाधिकारी, अधिकारी व सेवकांनी मंडई येथे भेट देवून या उपक्रमाचे कौतुक केले. दिनांक १४/९/२००८ रोजी श्रींचे मिरवणुकीद्वारे विसर्जन करण्यात आले. यामध्ये समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मनपा अधिकारी व सेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

हा गणेशोत्सव यशस्वीरित्या व शांततामय वातावरणात पार पडणेकामी श्री. अरुण कदम, अध्यक्ष, श्री. विठ्ठल जगदाळे, कार्याध्यक्ष, सर्वश्री तुकाराम जगताप, पांडुरंग सावंत, पोपट गवळी, संजीव मोरे, उपाध्यक्ष व इतर सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी अविरत परिश्रम घेतले.

## जकात कार्यालयाकडील सेवकांना प्रशिक्षण

मे राज्य शासनाने पुणे महापालिकेसाठी सुधारित जकात नियमावली २००८ मान्य केली आहे. सुधारित जकात नियमावलीमधील तरतुदींच्या अनुषंगाने जकात विभागाकडील नाक्यावर काम करणाऱ्या सेवकांसाठी प्रशिक्षण देण्याची मागणी पीएमसी एम्प्लॉईज युनियन या संघटनेने दि. २५/८/२००८ रोजीच्या बैठकीत सूचित केले आहे. त्या अनुषंगाने जकात कर उगवणी अधिक चांगल्या प्रकारे करण्यासाठी नाक्यावरील कागदपत्रांची तपासणी, संगणकीय कामकाज, सुधारित जकात नियमावलीमधील तरतुदी आणि स्थायी आदेश या विषयांवर दिनांक १ ते ५ सप्टेंबर, २००८ या कालावधीत सकाळी ११ ते १ व दुपारी ४ ते ६ अशा दोन सत्रांत कॅ. वडके सभागृह येथे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचा लाभ एकूण १५३ सेवकांनी घेतला. त्यामध्ये जकात नाक्यावरील पर्यवेक्षक, नाका अधिकारी व तदनुषंगिक सेवकांचा समावेश होता. प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींना मा. मधुकर नागपुरे, आयातकर अधिक्षक यांनी मार्गदर्शन केले. या संपूर्ण कालावधीत पीएमसी एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष श्री. तुकाराम जगताप उपस्थित होते.



याशिवाय जकात नाक्यावर प्रत्यक्ष काम करणाऱ्या सेवकांची डॉ. कोटणीस दवाखाना (गाडीखाना) येथे प्रतिदिन १५ सेवकांची वैद्यकीय तपासणी करुन घेण्यात येत आहे. या दोन्ही स्तुत्य उपक्रमांबद्दल मा. श्री. कुंडलिक कारकर, आयातकर प्रमुख आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे हार्दिक आभार.

## आदर्श मोकादम स्पर्धा

पुणे महानगरपालिका आणि डॉ.नानासाहेब परुळेकर सकाळ चॅरिटेबल ट्रस्ट यांचे संयुक्त विद्यमाने सन २००८ मध्ये आदर्श मोकादम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :

**१. स्पर्धेचा कालावधी :** १ मे २००८ ते ३० नोव्हेंबर, २००८

**२. परीक्षक :** वैद्यकीय व्यावसायिक, अधिवक्ता, वास्तु विशारद, शासनप्राप्त लेखापाल आणि कंपनी सचिव

**३. पारितोषिक :** पारितोषिक प्राप्त करणेसाठी किमान प्रतिशत ६० गुण मिळविणे आवश्यक आहे. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयामधून प्रथम, द्वितीय आणि तृतीय अशा तीन क्रमांकांना अनुक्रमे रु. ३०००, रु.२,५०० व रु. २००० अशी पारितोषिके देण्यात येतील.

त्याप्रमाणे १४ क्षेत्रीय कार्यालयात एकूण ४२ मोकादमांना पारितोषिके देण्यात येणार आहेत. त्याशिवाय ४२ मोकादामांपैकी गुणानुक्रमे पहिल्या तीन मोकादमांना सर्वोत्कृष्ट मोकादम म्हणून अनुक्रमे रु. १००००, रु. ७५०० व रु. ५००० अशी पारितोषिके देण्यात येतील. पारितोषिकाचे स्वरुप सन्मानपत्र व रोख रक्कम असे राहील.

**४. पारितोषिक वितरण समारंभ :** ९ डिसेंबर, २००८.

उपरोक्त स्पर्धा महापालिकेतील मोकादम सेवकांसाठी आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेमध्ये सर्व क्षेत्रीय कार्यालयाकडील मोकादम सेवकांनी सहभागी व्हावे. दैनंदिन कामकाजात सुधारणा करुन महापालिकेच्या स्वच्छतेच्या कामात तत्परता दाखवावी आणि आलेल्या संधीचा पूर्ण लाभ घ्यावा, असे आवाहन या निमित्ताने करण्यात येत आहे.

## माहिती अधिकार अधिनियम कार्यशाळा

पान १ वरुन

प्राधिकरणाने त्यांचेकडील अभिलेख व्यवस्थापन यामध्ये निर्मिती, वर्गिकरण, जतन आणि अनावश्यक अभिलेख्यांची विल्हेवाट लावणे या बाबी अतिशय चोख व परिणामकारकपणे वेळीच करणे आवश्यक असल्याचे मत प्रतिपादन केले. याबाबत पुणे महापालिकेने सन १९५६ मध्ये प्रसृत केलेले मार्गदर्शक आदेश अचूक व योग्य असून उपयुक्त असल्याचे नमूद के ले. याशिवाय अभिलेख व्यवस्थापन आणि माहिती अधिकारामधील त्याचे महत्व याबाबत माहिती दिली.

अधिनियमातील महत्वाच्या तरतुदी : ॲड. गणेश हलकारे यांनी आपल्या सुलभ व सुबोध मार्गदर्शनामध्ये माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील सर्व तरतुदींचे तपशिलवार विवेचन केले. अधिनियमातील अत्यंत महत्वाचा घटक जन माहिती अधिकारी यांची भूमिका आहे. जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सुरुवातीसच माहिती उपलब्ध करुन दिल्यास व कलम ४ मध्ये नमूद केल्यानुसार १ ते १७ बाबींची माहिती आणि सार्वजनिक जनहितावर परिणाम करणारी धोरणे आणि निर्णय जाहीर व प्रसिध्द केल्यास अर्ज व अपिलांची संख्या निश्चितच कमी होईल, असे ठाम प्रतिपादन केले. याशिवाय कार्यालयामधील अभिलेख सूचीबध्द आणि त्यांची निर्देश सूची तयार करुन संगणकीकरणाद्वारे नेटवर्किंग केल्यास ते अतिशय उपयुक्त असे ठरणार आहे. कलम ५ मधील अपिल अधिकारी, जन माहिती अधिकारी व सहाय्यक जन माहिती अधिकारी यांच्या नेमणुका, त्यांची कर्तव्ये याबाबत मार्गदर्शन करताना त्यांनी पुन्हा जन माहिती अधिकारी हा या कायद्याचा केंद्रबिंदू आहे. त्यांचे पद केंव्हाही रिक्त ठेवता येणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची सूचना त्यांनी दिली. कलम ६ नुसार अर्ज करण्याची पध्दत, उत्तर/माहिती देण्याचा कालावधी, अपिल करण्याची मुदत, सुनावणी घेण्याची मुदत, इत्यादी बाबींची माहिती दिली. यामध्ये एका सार्वजनिक प्राधिकरणामधील अर्ज हस्तांतरणासाठी कोणत्याही प्रकारची मुदत नसल्याचे त्यांनी सांगितले. अर्जास उत्तर देताना कलम ८ मधील तरतुदींचा आधार घेतल्यास त्याप्रमाणे स्पष्ट नमूद करुन त्याविरुध्द कोणत्या अपिल अधिकाऱ्याकडे किती कालावधीमध्ये अपिल दाखल करता येईल, याचाही स्पष्ट उल्लेख जन माहिती अधिकारी यांनी करणे आवश्यक असल्याचे आणि माहिती देणे आहे हा सकारात्मक संकेत या कार्यशाळेतून घेवून जाणे आहे, असे स्पष्ट व आग्रही प्रतिपादन त्यांनी केले.

अपिल अधिकाऱ्याचे आदेश - सुस्पष्टता : जन माहिती अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुध्द दाखल झालेल्या अपिलांची सुनावणी कशा पध्दतीने घ्यावी, जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची पडताळणी करुन व अर्जदाराचे म्हणणे समक्ष ऐकून जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही सदभ्भावनेने केली आहे, माहिती देण्याचा त्याचा हेतू आहे, इत्यादी बाबी अपिल अधिकारी यांनी विचारात घेवून निर्णय देणे आवश्यक आहे. निर्णय देताना तो लेखी स्वरुपात नोंदवून त्याची प्रत अर्जदार व जन माहिती अधिकारी यांना देणे आवश्यक आहे. तसेच, दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत केली आहे अगर कसे याची खातरजमा करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे डॉ. अनिल डांगे यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये अपिल अधिकारी आणि जन माहिती अधिकारी यांची भूमिका स्पष्ट करताना मार्गदर्शन केले.

महापालिकेने केलेली कार्यवाही : कार्यशाळेदरम्यान मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) तथा समन्वयक यांनी महापालिकेने आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीबाबत पॉवर पॉईंटद्वारे सादरीकरण केले. यामध्ये श्री. जगताप यांनी मे. राज्य शासनाकडे सादर केलेली वार्षिक व सहामाही विवरणपत्राद्वारे महापालिकेने मोठ्या प्रमाणावर विहित मुदतीत अर्ज निकाली काढले असल्याचे सांगितले. याशिवाय मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग यांचे सूचनेनुसार कार्यवाही करणेकामी कार्यालयीन आदेश निर्गमित केले असून, कलम ४ नुसार सर्व विभागांनी माहिती संकेत स्थळावर प्रसिध्द केल्याचे स्पष्ट केले.

मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) तथा समन्वयक यांनी कलम ४ नुसार प्रसिध्द करावयाच्या माहितीमध्ये सुसंगती व एकसूत्रता रहावी या कामी एक नमुना विहित करण्यात आला आहे, त्या नमुन्यामध्ये यापूर्वी दिलेल्या माहितीशिवाय नवीन माहिती संकलित करण्यात येत असून, ४१ जन माहिती अधिकाऱ्यांपैकी २० जन माहिती अधिकाऱ्यांनी नवीन विहित नमुन्यामध्ये माहिती दिल्याचे स्पष्ट केले. त्याचबरोबर पॉवर पॉईंटद्वारे सल्लागार (कामगार) विभागाने नवीन नमुन्यात कशा प्रकारे माहिती दिली जाणे अपेक्षित आहे, याचे प्रेझेंटेशन या सत्रामध्ये केले. नवीन नमुन्यामध्ये माहिती देताना मा. कारकर, आयातकर प्रमुख, मा. नागपुरे, आयातकर अधिक्षक, मा. कानडे, कर आकारणी कर संकलन प्रमुख, त्यांचे सहकारी मा. सोनकांबळे, सहाय्यक कर आकारणी कर संकलन प्रमुख यांनी अत्यंत उत्तम प्रकारे या नवीन नमुन्यामध्ये माहिती दिली असल्याचे स्पष्ट करुन, त्या चौघांचे विशेष अभिनंदन केले. त्याचबरोबर नवीन नमुन्यामध्ये माहिती भरणेकामी काही अडचणी आणि शंका असल्यास सल्लागार (कामगार) कार्यालयाशी संपर्क साधण्याची विनंती सर्वांना केली.

मा. आयुक्त, पुणे महापालिका - मनोगत : कार्यशाळेस तदनंतर मा. प्रवीणसिंह परदेशी, आयुक्त, पुणे महापालिका यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनामध्ये त्यांनी महापालिकेमधील अधिकाऱ्यांकडे विविध प्रकारची कामे सुपूर्त करण्यात आली आहेत. त्यामुळे कदाचित या अधिनियमाच्या अंमलबजावणीमध्ये काही प्रमाणात विलंब झाला असल्याची शक्यता व्यक्त केली. तथापि, कामाची व्याप्ती आणि अधिनियमाची अंमलबजावणी या दोन्ही बाबीस पूर्ण न्याय देणे आवश्यक आहे. माहिती अधिकारामध्ये सर्वच अर्जदारांचे समाधान होईलच याची खात्री देणे शक्य नाही. तथापि, काही अर्जदार अनेक प्रकारे एकाच माहितीची वारंवार मागणी करतात. त्यामुळे काही प्रमाणात प्रशासकीय यंत्रणेवर ताण येतो. महापालिकेतर्फे अधिनियमाच्या अंमलबजावणीकामी आतापर्यंत समाधानकारक कार्यवाही करण्यात आल्याचे स्पष्ट केले.

मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग - मनोगत : कार्यशाळेच्या शेवटी मा. कुवळेकर, आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनामध्ये त्यांनी अपिल निर्गत प्रकरणी महापालिकेकडून उपस्थित अपिल अधिकारी पूर्ण तयारीनिशी येत नाहीत. तसेच, दिलेल्या आदेशांचे विहित मुदतीमध्ये पालन करत नाहीत, इत्यादी त्रुटी निर्देशित केल्या. तसेच, अधिनियमातील कलम ४ अन्वये महापालिकेने माहिती नियमितपणे अद्ययावत करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. त्याच बरोबर गेल्या सहा महिन्यात या अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत प्रगती असल्याचे स्पष्टपणे मान्य करुन अजून प्रगतीची अपेक्षा व्यक्त केली. याशिवाय या अधिनियमाच्या अंमलबजावणीकामी महापालिकेच्या कामकाजाची एकूण व्याप्ती व येणाऱ्या अर्जांची संख्या विचारात घेवून स्वतंत्र कक्ष निर्माण करुन त्याद्वारे कार्यवाही करणे अपरिहार्य आहे. त्या अनुषंगाने गांभीर्याने विचार व्हावा, जेणेकरुन या संपूर्ण अंमलबजावणीच्या कामात सुसंगती व एकसूत्रता राहील, असे स्पष्ट प्रतिपादन त्यांनी केले.

विशेष अपिल निर्गत कार्यक्रमांतर्गत मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग तसेच त्यांच्या कार्यालयातील सर्व सहकारी आणि सेवकवर्ग यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आणि यशदाने सदर कार्यशाळा आयोजित करुन केलेल्या सहकार्याबद्दल, विशेषत: मा. माने, सल्लागार, माहिती अधिकार कक्ष, यशदा, मा. नवीन यादव आणि त्यांचे सर्व सहकारी या सर्वांचे आभार मानले आणि असेच सहकार्य यापुढे मिळावे अशी भावना व्यक्त केली.

कार्यशाळेच्या शेवटी श्री. नवीन यादव, माहिती अधिकार कक्ष, यशदा यांनी सर्व प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी यांचे आभार मानून कार्यशाळा संपन्न झाली. सदर कार्यशाळा यशस्वी होणेकामी यशदा संस्थेबरोबरच सल्लागार (कामगार) कार्यालयातील जन व सहाय्यक जन माहिती अधिकारी अनुक्रमे मा. शिवाजी दौंडकर, सौ. ज्योती भोसले आणि श्री. सुरेश ढाणक यांचेसह सर्व सहकारी सेवकांनी विशेष प्रयत्न केले.

## औंध क्षेत्रीय कार्यालयाकडील गणेशोत्सव

पुणे महानगरपालिकेच्या औंध क्षेत्रीय कार्यालयाकडून गणेशोत्सव २००८ च्या निमित्ताने मार्च, २००८ पर्यंत निवृत्त झालेल्या सेवकांचा दिनांक ८/९/२००८ रोजी मा. मा. सुरेश जगताप, उप आयुक्त (वि.का.क्र.१), मा. मुक्ता मनोहर, जनरल सेक्रेटरी, पुणे मनपा कामगार युनियन, मा. राजेंद्र जोशी, वैद्यकीय अधिकारी, मा.मुकुंद भोसले, क्षेत्रीय अधिकारी , मा. खंडू निमण, सहाय्यक अभियंता , आरोग्य निरीक्षक व उप आरोग्य निरीक्षक पोटे साहेब यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये श्रीमती हरणाबाई देखणे, श्रीमती सावित्रीबाई खुडे, श्री. सुरेश मण्यार, श्री. सदाशिव यादव, श्री. व्ही.पी.गायकवाड तसेच श्री. संभाजी कदम, इत्यादी सेवकांचा स्मृतीचिन्ह, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.

मा. सुरेश जगताप, उप आयुक्त (वि.का.क्र.१) ह्यांनी निवृत्त झालेल्या सेवकांना त्यांच्या उर्वरित आयुष्याकरिता शुभेच्छा दिल्या. तसेच मा. मुक्ता मनोहर, जनरल सेक्रेटरी, पुणे मनपा कामगार युनियन ह्यांनी सुध्दा सेवकांना शुभेच्छा दिल्या. ओला कचरा, सुका कचरा वेगळा करण्याबाबत प्रचारफेरीचा संदेशही दिला.

ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युनियनचे जेष्ठ कार्यकर्ते श्री. विजय जाधव ह्यांनी केले. तसेच श्रीमती मंगल रासगे यांनी आभार प्रदर्शन केले. श्रीमती लक्ष्मी कांबळे, तात्या कांबळे, श्रीमती जयश्री भिसे यांनी सुध्दा कार्यक्रमात सहभाग घेतला.

## अभियंता दिन साजरा

पुणे महापालिकेच्या सर्व अभियंता सेवकांच्या उपस्थितीत दिनांक १७/९/२००८ रोजी एस.एम.जोशी फौंडेशन येथे अभियंता दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास मा. विजय कुवळेकर, आयुक्त, राज्य माहिती आयोग यांची प्रमुख उपस्थिती होती. आपल्या मार्गदर्शनामध्ये ध्येयपूर्तीचा ध्यास असल्याशिवाय माणसे मोठी होत नाहीत. समाजामध्ये वावरताना अनेक चांगली माणसे भेटतात. मात्र त्यांच्या मोठेपणाची जाण ओळखता आली पाहिजे. मानवी मनाच्या संवेदना बोथट होत चालल्यामुळे चांगल्या गुणांची पारख न करता केवळ दुर्गुणांकडे लक्ष केंद्रीत केले जात असल्याची खंत मा. कुवळेकर यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमामध्ये महापालिकेच्या विविध विभागात उल्लेखनीय काम केलेल्या अभियंतांना गुणवंत अभियंता पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात मा. मुक्ता मनोहर, मा. ज्ञानेश्वर मोळक, मा. विवेक खरवडकर, इत्यादींची समायोजित भाषणे झाली.

**कल्याणवार्ता**
**ऑक्टोबर, २००८**
❖ **प्रकाशक तथा अध्यक्ष** ❖
**कामगार कल्याण निधी**
**मा. प्रवीणसिंह परदेशी**
आयुक्त, पुणे महापालिका
❖ **संपादक** ❖
मा. नंदकिशोर जगताप
सल्लागार (कामगार)
❖ **कार्यकारी संपादक** ❖
श्री.शिवाजी दौंडकर
कामगार कल्याण अधिकारी
❖ **सहाय्यक** ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ **मुद्रक** ❖
श्री. जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ **प्रकाशन स्थळ** ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ **संपर्क** ❖
सल्लागार (कामगार) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/१२५२/१२५३
ईमेल आयडी
nandkumar.jagtap
@punecorporation.org
**फक्त खाजगी वितरणासाठी**
(विनामूल्य)